# मुंबई विद्यापीठ

तात्काळ/अति महत्वाचे

क्र.वि.नि.वि.वि/४३२/ ३ /२०१५,
मुंबई – ४०० ०३२,
१० जुलै, २०१५,

परिपत्रक :–

विषय:– दि. २७ फेब्रुवारी २०१५ रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करणेबाबत

संदर्भ :–विद्यापीठ विभागाचे परिपत्रक
१) क्र. वि.नि.वि.वि./४३२/२२/दि. ३ फेब्रुवारी २०१५
२) क्र. वि.वि.भ./४२/दि. ९ फेब्रुवारी २०१५
३) क्र. वि.वि.भ./५१/दि. २५ फेब्रुवारी २०१५

महोदय/महोदया,

वरील संदर्भिय परिपत्रकांन्वये आपणांस महाराष्ट्र शासन व मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार असे सुचित करण्यात आले होते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयात व विद्यापीठामध्ये मराठी राजभाषा दिन साजरा करण्याचा उपक्रम आपल्या शैक्षणिक संस्थेत आयोजित करण्यात यावा. त्यासाठी संलग्नित महाविद्यालयांनी तसेच विद्यापीठाच्या विविध विभागामध्ये/संस्थामध्ये आपापल्या अर्थसंकल्पात आवश्यक ती आर्थिक तरतुद करावी व या दिनासाठी आपल्या संस्थेत सदर कार्यक्रम साजरा करण्याची रूपरेषा कशी तयारी केली आहे अथवा करण्यात येत आहे त्याबाबतची माहिती त्वरीत सदर विभागास कळवावी.

तसेच असेहि सुचित करण्यात येत आले होते की, महाराष्ट्राची राजभाषा आणि लोकभाषा असलेल्या मराठीचे जतन व संवर्धन व्हावे, असा यामागील मुख्य हेतू आहे. सदर मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्गत विविध उपक्रम राबवताना खालील हेतूंची पूर्तता करण्यात यावी.

१) विद्यार्थ्यांची वाङ्मयातील अभिरूची घडवणी या उपक्रमांबरोबर त्यांची भाषिक जाणीव समृध्द करणे.
२) अमराठी भाषिकांना मराठी भाषेचा व संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आणणे.
३) साहित्येतर व्यवहारक्षेत्रात मराठी भाषेचा वापर वाढवून मराठीला ज्ञानभाषेची प्रतिष्ठा प्राप्त करून देणे.
४) जागतिकीकरणामुळे एकूणच भारतीय भाषांपुढे उभ्या ठाकलेल्या आव्हांनाबाबत जागृती निर्माण करून त्या आव्हांनाला सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मराठी भाषेच्या संवर्धनात विद्यापीठाला आपले दायित्व नीट पार पाडता यावे म्हणून हा महत्वपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे, या निर्णयाची गांर्भियाने व प्रभावीपणे अंमलबजावणी आपल्या महाविद्यालयामार्फत झाली असल्यास आणि आपण त्याचा अहवाल विद्यापीठास अद्याप पाठविला **नसल्यास** तसा अहवाल सदर कार्यालयात ताबडतोब सादर करावा.

....२/–

आपणांस असेहि कळविण्यात येते की, पावसाळी अधिवेशन सुरू होणार असल्यामुळे विधानपरिषदेमध्ये मा. सदस्यांनी याबाबत गंभीर दखल घेऊन मुंबई विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांनी मराठी भाषा दिन साजरा करण्याबाबत विविध तारांकित प्रश्न विचारले असल्यामुळे सदर उपक्रम आपल्याकडून न राबविल्यास विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निर्णयान्वये आपल्या महाविद्यालयावर कारवाई करणे विचाराधीन ठरेल.

मुंबई – ४०० ०३२
दि. १० जूलै २०१५

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)

प्रत रवाना:– प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

C1/कमल/मराठी–२/१०७२०१५